## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/११/२०१७

**१) मोटार पंपची चोरी . :–**

दिनांक ०७/११/२०१७ चे ०८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी शंकर मोतीराम वैद्य वय ६९ वर्ष, रा. कोसरा याचे शेतावर असलेल्या विहीरीमध्ये आत फिट केलेली ३ एच.पी.ची सी. आय. आय. कंम्पनीची मोटार पंप किंमती ८६००/–रु. कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने अश्या फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) किराणा दुकानातील सामानाची चोरी .:–**

दिनांक १२+१३/११/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी सचिन शंकर लांजेवार वय ३५ वर्ष, रा. तसेच विकास हरीचंद्र बुराडे यांचे किराणा दुकाणाचे भिंतीला छिद्र पाडुन आणि सटरची पट्टी तोडुन दुकानाचे आत प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोरांनी ड्रायफुड च्या ३ किलोच्या ३ बरण्या, ज्यामध्ये काजु, किसमीस, बादाम, परफ्युम, ब्रॉडीस्प्रे ३० नग व गल्यातील नगदी ५००/–रु. व विकास बुराडे याचे दुकानातील परफ्युम, २ नग, सिगारेट, पॉकीट ७ नग व गल्यातील चिल्लर १०००/–रु. असा सर्व माल मिळुन किंमती २२,९००/–रु. चोरुन नेल्याने अश्या फिर्यादी यांच्या तोंडी पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. बावणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) लाचलुचपत प्रतिबंधक कारवाई यांची कारवाई. :–**

दिनांक १६/०९/२०१७ चे ०९.२९ ते १९.२५ वाजता. दरम्यान यातील ओरोपीने तक्रारी फुलसिंग राठोड यांना पडताळणी पंचनामा क्र. २ दिनांक १६/०९/२०१७ अन्वये तक्रारदार यांना सन २०१५–२०१६ मध्ये स्वर्गवासी उत्तमराव पाटील उद्यान डोंगरला येथे ३४,५१,०००/–रु. अश्या कामा पैकी ७,१५,०२५/–रु. ची कामे करण्यात आले नाही किंवा कमी प्रमाणात करण्यात आलेले आहे. त्यामुळे ७,१५,०२५/–रु. ची वसुली न करण्यासाठी तसेच केलेल्या कामाची तक्रारदार यांचे बाजुने चौकशी अहवाल पाठविण्यासाठी २,००,०००/–रु. लाचेची मागणी करुन शिल्लक रक्कम ही संजय एकापुरे या व्यक्ती मार्फत स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आरोपी यांचे कृत्य वरील कलमान्वये होत असल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ७ ला.प्र.का.सन १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. पारधी एसबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे

**४) शेतातील धानाचा पुंजना जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :– .**

दिनांक १३/११/२०१७ चे ०२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अरविंद रामदास बोरकर वय ४५ वर्ष, रा. भुयार हा आपले घरी झोपला असता कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन शेतातील वायएसआर धानाचा पुजंना जाळुन किंमती ७० हजार ते ८०हजार रुपयाची नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४३५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. चेटुले हे करीत आहेत.

**५) रात्रीचे अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–.**

दिनांक १३/११/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा अंधारात लपुन छपुन आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. हवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२(क) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. माहुर्ले हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/११/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही रेल्वे स्टेशन रोड वरठी ही आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना रायपुरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. रायपुरे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**७) गळफास लावुन इसमाचा मृत्यु .:–**

दिनांक १३/११/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक राजु काशीराम नारनवरे वय ४५ वर्ष, रा. पाहुणगाव हा अपले जनावरे बांधण्याचे गोठयात सुती दोरीने गळफास लावुन मृत अवस्थेत दिसुन आल्याने फिर्यादी विनय काशीराम नारनवरे वय ३६ वर्ष, रा. पाहुणगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.उपनि. चाबुकस्वार पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

८) अवैध दारू / जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १३/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, वरठी, लाखणी तुमसर, सिहोरा व साकोली येथील अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३७ लिटर हातभट्टी दारू किंमती २९००/–रूपया चा माल तसेच जुगारातुन किंमती १४५६/–रु. असा एकुण ४,३५६०/– रुपया चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १२/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०२ तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.